ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# काझड गावचा इतिहास

प्रा. संतोष शेलार
कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे महाविदयालय, सटाणा
जि.नाशिक.



## पार्श्वभूमी :

काझड हे गांव इंदापूर तालुक्यातील गाव असून इंदापूरच्या पश्चिमेस ३० कि.मी. तर भिगवणच्या दक्षिण बाजूस सुमारे १८ कि.मी. वर वसलेले आहे. त्यालगतच्या शिंदेवाडी, बोरी, लाकडी, निंबोडी ही गावे आहेत.

## गावनामाची उत्पत्ती :

गावातील जेष्ठ नागरीक श्री पोपटकाका कुलकर्णी (इंगळे) यांच्या मते गावाचे मुळ गाव कंकावती असे होते .[1] येथे काजळे आडनावाचे लोक राहत असत. काजळचा उपभ्रंश होत काजड काझड असे नाव पडले असावे [2] पर्वती नरूटे (गुरूजी) यांचे मते गावचे मूळ नाव काजळी असे असावे पुढे ते काझड बनले .[3] मात्र काही नागरीकांनी असे मत व्यक्त केले की गावचे नाव पुर्वी मलकापूर असे असावे कारण गावात मलकेश्वराचे मंदिर आहे.[4] गावनामाची उत्पत्ती स्पष्ट होत नाही मात्र ते अपभ्रंशातून तयार झाल्याची शक्यता मात्र व्यत होते.

## धार्मिक बाबी :


काझड गावचे ग्रामदैवत भैरवनाथ हे असून दिवाळी मध्ये भाऊबिजेच्या दुसऱ्या दिवशी कार्तिक शुध्द तृतियेला भैरवनाथाची यात्र भरविली जाते.[5] यात्रेत तमाशा व कुस्त्यांचा फड हा इतर यात्रांप्रमाणेच वैशिष्टय आहे . सिध्देश्वर, मलकेश्वर हे इतर देव गावात आहेत . सिध्देश्वरास सिदोबा, सिध्दनाथ असेही संबोधले जाते. गावाच्या मध्यभागी सिध्देश्वराचे हेमाडपंती मंदिर आहे.[6] गावात मलकेश्वराचेही दगडी मंदीर असून हेमाडपंथी रचना असलेले व मोठा सभामंडप असलेले मंदीर आहे .[7] विशेष म्हणजे मंदीरातील गाभाऱ्यात पायऱ्या उतरून जावे लागते. गावात अनेक ठिकाणी विखूरलेल्या स्वरूपात दगडी शिळा आहेत. यातील नागाची शिळा वैशिष्टयपुर्ण आहे. या शिळांपैकी बहुतेक शिळा विरगळ आहेत. सिध्दनाथ हे नरूटे पाटलांचे कुलदैवत असून माहि पौर्णिमेला सिध्दनाथाची जत्रा भरवली जाते . ज्यामध्ये बकरी कापली जातात.[8] भैरवनाथ व नागनाथ या देवतांची पुजा अर्चा आराधना म्हेत्रे कुटुंबाकडून केली जाते.[9]


## सामाजिक बाबी :

गावात नरूटे, म्हेत्रे, शिंदे, झगडे, कुलकर्णी इत्यादी आडनावांची कुटुंबे पुर्वपरंपार राहत आहेत .[10] नरूटे आडनावांच्या लोकांकडे पुर्वी पाटीलकी होती . नरूटे नावची उत्पत्ती मोठी रंजक आहे . नरूटे हे नाव नरहटवेचे अपभ्रंश झालेले रूप आहे . पारंपारीक मौखिक माहितीनुसार पुर्वीचे राजे अश्वमेध यज्ञ करीत या यज्ञानंतर राजाचा घोडा प्रदेशव्याप्तीसाठी मोकळा सोडला जात . असाच एक घोडा अडविल्याने सदर कुटुंबास नरहटवे नाव पडले त्यात पुढील काळात बदल होत न्हरूटे आणि नंतर नरूटे असे नाव तयार झाले.[11]




*काझड: मलकेश्वर (महादेव) मंदिर , मुळ मंदिराची रचना १२ व्या ते १४ व्या शतकातील असावी. शिखर जुणेच असावे पण त्याचा जिर्णोध्दार केलेला असावा. मंदिरा समोरील दगडी खांबांचा मंडप उत्तर मध्ययुगातील अर्थात मराठा कालखंडातील असावा. त्याला आधार देण्यासाठी नंतर बाहेरुन दगडी भिंत बांधलेली आहे.*







*मंदिराचे वै शिष्ठ्य म्हणजे गाभारा खोल असून त्यासाठी पाय ऱ्या उतरून जावे लागते. मधील फोटो दगडी मंडपाचा असून त्यातही दगडी पिंड व नंदी आहे. त्यालगत उजवीकडील फोटोत गाभाऱ्याचे छत दिसत आहे, ते कदलीकाकृत शैलीतील आहे.*



*या मंदीरातच वरील तीन मुर्ती ठेवलेल्या आहेत, नागदेवता, महादेव व गणपती.*




*मलकेश्वर मंदिरालगतची दगडी इमारत व दिपमाळ*




*उजवीकडील चित्रात पाटीलबुवांची समाधी असून डावीकडील चित्रातील इमारतीस चोपाळा म्हटले जाते , येथे पिंड व नंदी आहे.*





*हे हनुमान मंदीर असून मध्ययुगातील आहे , उजवीकडील चित्रात मंदीरातील मूर्ती असून डावीकडील चित्रातील मूर्ती गावातच झाडाखाली ठेवलेली आहे.*



*हे महादेव मंदीर असून तेसुध्दा मध्ययुगातील आहे. त्याच्या उजवीकडील चित्रात गाभा  ऱ्याचे छत दिसत आहे , ते कदलीकाकृत शैलीतील आहे. डावीकडील चित्रात पिंड आहे.*



*वर डावीकडील चित्र भैरवनाथाचे मंदिर तर उजवीकडे जाना ई देवीचे मंदिर आहे. दोनही मं दिरे सध्याच्या काळातील असून या सिमेंट कॉंक्रीटच्या रचना आहेत.*



*गावची कुस्ती परंपरा दर्शवणारे मैदान*



*गावात विवीध ठिकाणी अढळणाऱ्या पिंडी*



***गावात वि विध ठिकाणी अढळणारे वीरगळ. वीरगळ हे मुख्य तः युध्दात कामी आलेल्या तसेच कर्तृत्ववान अर्थात वीर पुरूषांच्या स्मृतीप्रित्यर्थ बनविले जात असत.***

जळ काढणे ही एक वैशिष्ट्यपूर्ण प्रथा या गावात अढळते. जळ लग्नसमारंभाअगोदर काढला जातो. एखाद्या वधु किंवा वराचा जळ काढण्यासाठी सात सवाष्ण बायका सात कलशांत नदी किंवा विहीरींचे पाणी आणतात. त्या पाण्याने तांदूळ धुवून शिजवला जातो यास जळ काढणे असे संबोधले जाते .[12] गावात पूर्वी पाण्याच्या सोयीसाठी ५ आड होते . जातिनिहाय हे आड वाटून देण्यात आले होते . जसे रामोशीआड, महारवाडाआड, कुंभारआड, मांगवाडाआड, बामणांचाआड व वाण्यांचा आड इत्यादी .[13] यावरून तत्कालिन जातिव्यवस्थेचे ताठर स्वरूप व्यक्त होते.

### आर्थिक व कृषिविषयक बाबी :

सिंचन सुविधा निर्माण होण्या पूर्वी गावात ज्वारी , बाजरी, हुलगे, मटकी, हरभरा अशी पिके घेतली जात . उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता शक्य असणारे शेतकरीच ऊस व कापसाचे पिक घेत असत . खपली गव्हाचेही उत्पादन होत असे .[14] सणसर या लगतच्या गावात खडकवासला धरणाचे पाणी आणल्यानंतर सदर कॅनॉल लगतच्या भागातून पाईपलाईन द्वारे पाणी आणल्याने बागायती क्षेत्रात वाढ झाली .[15] पुर्वी गावात अनेक ठिकाणी धान्य साठवण्यासाठी पेव असल्याची माहिती मिळते.

### राजकीय बाबी :

काझड गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत १९५७ साली बनवण्यात आली . सध्या कविता दशरथ मोरे या सरपंच असून सचिन काशिनाथ नरूटे हे उपसरपंच आहेत . दादासाहेब संभाजी नरूटे हे पूर्वी पंचायत समितीचे सदस्य होते . १९७२ च्या दुष्काळात त्यांनी मोठे कार्य केलेले होते.[16]

### शैक्षणिक विकास :

गावात पहिली शाळा १९३३ साली सुरू झाली . यावेळी दामोदर गोविंद कुलकर्णी यांनी या कामात पुढाकार घेतला .[17] चौथी पर्यंतच्या या शाळेस लोकल बोर्डाचे सहाय्य होते . १९६४ नंतर या प्राथमिक शाळेस सोडून पाचवी ते सातवी पर्यंतचे वर्ग सुरू केले . त्यासाठी सुभेदार पाटील व गोसावी गुरूजी यांचे प्रयत्न महत्त्वाचे ठरले . १९८८ साली प्रकाश नरूटे पाटील यांचे प्रयत्नातून गावात भैरवनाथ माध्यमिक विद्यालय सुरू केले.[18]

### पाटीलकी व इनामे :

गावातील परंपरागत पाटीलकी नरूटे कुटुंबाकडे होती .[19] इंगळे, कुलकर्णी यांना बोरी व काझड येथील कुलकर्णी वतन होते .[20] इ. स. १६४९–५० साली छत्रपती शिवाजी महाराजांनी कारकून प्रात इंदापूर यांस लिहीले आहे की राजश्री (मोरेश्वर) गोसावी यांस मौजे काझड व मौजे सेलगाव येथे प्रत्येकी एक चावर जमिन आणि जकात महालावर रोजमुरा १०६ इनाम दिले आहे .[21] सदर इनामाचे सातत्य पुढील काळातही दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांची याच संदर्भाने १६५३[22] व १६५४-५५[23] सालाची पत्रे असून त्यात म्हटले आहे की त्या चावरांची किर्दी तुम्ही करून त्यास रक्कम देणे . पेशवेकाळात सुध्दा या इनामाचे सातत्य दिसते . इ.स. १७३० या कागदपत्रानुसार धुंडीराज गोसावी व सर्वोत्तम गोसावी बीन मोरेश्वर गोसावी वास्तव्य मोर गाव यांना इनाम जमीन चावर १ असा उल्लेख मिळतो.[24] छत्रपती शाहु काळात मुकासा अर्थात गाव जहागीर देण्याची प्रथा सुरू झाल्यावर सदर गाव १७२७–२८ व १७३० च्या कागदपत्रांनुसार खास पथक सुलतानजी व सिदोजी निंबाळकर यांस मुकासे दिलेले होते .[25] तर नंतरच्या एका कागदपत्रानुसार हे गाव जाधव नावाच्या सरदारास मुकास दिलेले होते.[26]

अशा प्रकारे काझड गावच्या इतिहासाची महिती मिळते. उज्ज्वल असा भूतकाळ असलेले हे गाव असून गावातील मध्ययुगीन मंदीर, वीरगळ यावरून गावचे एतिहासिक महत्त्व स्पष्ट होते . गावात सिंचनाच्या सुविधा झाल्याने गावच्या आर्थिक स्थितीत मोठा बदल झाल्याचे दिसते.

### तळटिपा :

1 श्री पोपटकाका कुलकर्णी (इंगळे) यांची मुलाखत

2 कित्ता

3 श्री पर्वती नरूटे (गुरूजी) यांची मुलाखत

4 कित्ता

5 कित्ता

[6] कित्ता

[7] कित्ता

[8] श्री पोपटकाका कुलकर्णी (इंगळे) यांची मुलाखत

[9] कित्ता

[10] श्री पर्वती नरूटे (गुरूजी) यांची मुलाखत

[11] कित्ता

[12] कित्ता

[13] कित्ता

[14] कित्ता

[15] कित्ता

[16] कित्ता

[17] कित्ता

[18] कित्ता

[19] कित्ता

[20] श्री पोपटकाका कुलकर्णी (इंगळे) यांची मुलाखत

[21] डॉ. कुलकर्णी अनुराधा गोविंद, *शिवछत्रपतींची पत्रे खंड१* , परममित्र पब्लिकेशन, प्रथमावृत्ती२०११, पृ. ३१९.

[22] कित्ता, पृ.३२३.

[23] कित्ता, पृ.३२४.

[24] पुणे पुरालेखागार, शाहु दप्तर, रूमाल क्रमांक २६, पुडके २, कागद क्रमांक व ३३४२१.

[25] पुणे पुरालेखागार, शाहु दप्तर, रूमाल क्र. २६, पुडके २, कागद क्र. व ३३४८९ व ३३३९७ .

[26] उपरोक्त, रूमाल क्र. ४३ पुडके ३ कागद क्र. ६०१४१.